# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./ ६९५ /२०२२ दि. २५ /०२/२०२२

## परिपत्रक

विषय :- ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणेबाबत.

संदर्भ :- १. मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र. मभादि-२०२२/प्रक्र-९/भाषा-३, दि. १६/०२/२०२२.
२. महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांचे पत्र क्र उशिस/२७ फेब्रु-म.भा.गौ. दिन/मवि-१/२०२२/१६३६, दि.२२/०२/२०२२

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, कविवर्य वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. त्याअनुषंगाने वि.वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन निमित्य सर्व संबंधितांना रविवार दि. २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक मराठी भाषा गौरव दिन सोहळा साजरा करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये सुचित करण्यात आले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी व त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

संलग्न - वरीलप्रमाणे.

25/2/2022
(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
४. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. डॉ. हेमंत बारसागडे, उपकुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
८. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
९. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. विजय सिलारे) 25-2-22
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ........ दि. ........
जावक क्र. 2024 दि. 24/2/2

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/२७ फेब्रु.-म. भा. गौ.दिन/मवि-१/२०२२/१८३६ दिनांक: .२.२०२२

22 FEB 2022

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र.617 दि.24/2/2022
जावक क्र.......... दि..........

**परिपत्रक**

**वाचा- मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र.: मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३ दि. १६.२.२०२२**

कविवार्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. म्हणूनच वि.वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याबाबतच्या सूचना, मराठी भाषा विभागाच्या दि. २१ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना **रविवार दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक मराठी भाषा गौरव दिन सोहळा साजरा करण्याबाबत** संदर्भांकित शासन परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. मराठी भाषा गौरव दिनासाठी, सदर धोरणाशी सुसंगत अशी "मराठी भाषा विभागाची वाटचाल व प्रगती" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. तसेच मराठी भाषा गौरव दिन सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन समारंभपुर्वक साजरा करण्यासाठी शासन परिपत्रक क्र.: मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३ दि. १६.२.२०२२ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न)

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालये, सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांनी संदर्भांकित शासन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी, मराठी भाषा गौरव दिनाचे समारंभ/सोहळा आयोजित करावा.

DR(Estt)
24/2

डॉ. बारसागडे
उपकुलसचिव (प्रशा)
24.2.22

जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य असेल तिथे केंद्र तसेच राज्य शासन यांनी आखुन दिलेल्या कोविड मार्गदर्शन नियमांचे काटेकोरपणे पालन करुन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

**(डॉ. प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रति,

१. प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तूत संचालनालय.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
४. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
५. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.
६. प्राचार्य, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये- महाराष्ट्र राज्य.

**ज्येष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२२.**

**वाचा** :- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दि.२१.०१.२०१३.

**प्रस्तावना** :-

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना रविवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी पुढील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

२. "मराठी भाषा गौरव दिन" हा कार्यक्रम मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरून "मराठी वाचन प्रेरणा दिन" व "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" या अन्य मराठी भाषा प्रचार प्रसार कार्यक्रमाबरोबर साजरा करण्यात येत असला तरी सध्याच्या कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने साजरे करण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. (जिथे प्रत्यक्षरित्या कार्यक्रम करणे शक्य आहे, तिथे केंद्र शासन / राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.)

३. मराठी भाषेचा प्रचार / प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरणाशी सुसंगत पारंपारिक पद्धतीने प्रचार / प्रसार करण्याबरोबर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध माध्यमांचा वापर करुन मराठी भाषेचा प्रचार / प्रसार विषयक खालील प्रमाणे कार्यक्रम

आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासाठी "मराठी भाषा विभागाची वाटचाल व प्रगती" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करण्यात येत आहे.

१) मराठी भाषा विभाग व क्षेत्रिय कार्यालयांनी एकत्रितपणे मराठी भाषा विषयक वाटचाल व प्रगती विषयक सर्व माहिती विविध माध्यमातून प्रसारित करावी.

२) कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता, अभिनव पध्दतीने साहित्य संमेलने ऑनलाईन पध्दतीने आयोजित करावीत. विशेषत: बाल साहित्य, विज्ञान साहित्य, बोली भाषेतील साहित्य असे मुख्य प्रवाहापेक्षा वेगळ्या शाखेतील विषय घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या संस्थांनी वरीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करुन त्याबाबत शासनास माहिती सादर करावी.

३) मराठी भाषेच्या प्रचार व प्रसाराकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करणे, प्रसारमाध्यमांतून प्रचार करणे, पुस्तके व कोश यांबाबत चर्चा, परिसंवाद, व्याख्याने इत्यादी उपक्रम योजावेत.

४) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव / सत्कार करणे.

५) कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता, तथा काळाची गरज लक्षात घेता, जास्तीत जास्त कार्यक्रम चर्चासत्रे, प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयांवरील तसेच, अशा स्वरूपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया ४) ई-बुक ५) स्व-प्रकाशन ६) युनिकोडचा वापर ७) ऑनलाईन पुस्तक विक्री ८)लेखक, प्रकाशन करार ९) संहिता लेखन १०) विश्वकोशाबाबत माहिती कार्यशाळा ११) शॉर्ट फिल्म / डॉक्युमेंटरी लेखन

वर नमूद विषय उदाहरणादाखल देण्यात आले आहेत. सदर विषयात विविध रोजगारविषयक अतिरिक्त विषयांचा समावेश करता येईल.

६) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी वरील अनुक्रमांक ३ प्रमाणे वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या ऑनलाईन

१४) मराठी भाषेच्या प्रचार / प्रसारासाठी अभिनव कल्पना सादर करून त्याप्रमाणे ऑनलाइन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१५) प्रसारमाध्यमे तसेच, प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन करावे.

१६) युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करावे.

१७) समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन करावे.

१८) मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन करावे.

१९) बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन करावे. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

२०) शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती याबाबतच्या स्पर्धांचे आयोजन करावे.

२१) मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन करावे.

२२) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या नि:स्पृह व्यक्तींना आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२३) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव / सत्कार करण्याबाबत कार्यक्रम आयोजित करावेत.

२४) विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदींची संख्या वाढावी यादृष्टीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने वर्षभर विविध कार्यशाळेचे आयोजन करावे. तसेच, नोंदींची संख्या वाढण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना कराव्यात.

२५) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये / सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

कार्यशाळांचे वेळापत्रक जाहीर करावे. त्यानुसार कार्यक्रम आयोजित करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

७) मराठी भाषेचा प्रचार / प्रसार ऑनलाईन पद्धतीने प्रभावीपणे कसा करता येईल या विषयावरील राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या संस्थांनी तज्ज्ञांच्या मदतीने ऑनलाइन कार्यशाळा आयोजित कराव्यात.

८) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

९) मातृभाषेची महती आणि माहिती तसेच, मातृभाषेचे व्यक्तिगत व समाज जीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे.

१०) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित करावे.

११) न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे तसेच, मराठी भाषेतून न्यायदान देण्याच्या कामास गती मिळावी यादृष्टीने विधी महाविद्यालयांनी “मराठी अभिमत न्यायालय” (Marathi Moot Court) च्या स्पर्धांचे आधुनिक माध्यमांचा वापर करून आयोजन करावे.

१२) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मराठी भाषाविषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करावेत.

१३) मराठी भाषा / साहित्य / कोश वाङमय या विषयांवर ऑनलाईन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे.

२६) मराठी भाषा विभागाची विविध संकेतस्थळे, क्षेत्रिय कार्यालयांची संकेतस्थळे, भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) याबाबतची माहिती सर्वसामान्यांना व्हावी या दृष्टीने सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी विविध माध्यमातून याबाबतची माहिती प्रसारित करावी.

२७) वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत घ्यावी.

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. |
| २. | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |
| ३. | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४. | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर. |
| ५. | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६. | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच **अ.क्र.२७** येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

४. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे.

५. सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२०२१६१२४३२९९०३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND BHAGWAN GAWADE

Digitally signed by MILIND BHAGWAN GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d043e1f55c6ded344ffebea8801d8c286bfdcafaea54c716c9b31b47b87a9476, pseudonym=3FD721BE2B19DF245E0157FD3DC7B26475009465, serialNumber=EF777B84EAC7F675E3493144EF06F0FA1CB47DE2A32BE1156CA04D038F42D6E1, cn=MILIND BHAGWAN GAWADE
Date: 2022.02.16 14:24:15 +05'30'

**(मिलिंद भ.गवादे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा.समिती प्रमुख व सदस्य, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई, (दूरदर्शन / आकाशवाणी / वृत्तपत्रे / भित्तीपत्रके या माध्यमातून विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी),
१३. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सूचना देण्याबाबत),
१४. सर्व विभागीय आयुक्त,
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७. भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे, मुंबई,
१८. अध्यक्ष / सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१९. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२०. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२१. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
२२. निवड नस्ती (भाषा-३).